आकाशवाणी मुंबई

राष्ट्रीय  बातमीपत्र - रात्री ८.०५ वाजता

२५  मार्च २०२४ - सोमवार

**ठळक बातम्या**

- निवडणुका पर्यावरणपूरक करण्यासाठी निवडणूक यंत्रणा आणि राजकीय पक्षांसाठी निवडणूक आयोगाकडून मार्गदर्शक तत्वं जारी

- लोकसभा निवडणुकीसाठी काँग्रेसची सहावी उमेदवार यादी जाहीर

- मध्य प्रदेशात उज्जैन इथल्या महाकालेश्वर मंदिरात लागलेल्या आगीत पुजाऱ्यांसह सुमारे १४ जण जखमी /राज्यसरकारकडून दुर्घटनाग्रस्तांना प्रत्येकी १ लाख रुपये आणि मोफत उपचारांची घोषणा

- युनायटेड वेस्टर्न बँकेचा वा. ग. चिरमुले पुरस्कार जलपुरुष डॉ. राजेंद्रसिंह यांना जाहीर

**आणि**

- धूलिवंदनाचा सण सर्वत्र उत्साहात साजरा

**<><><><><><>**

आगामी लोकसभा आणि विधानसभा निवडणूक पर्यावरणपूरक असावी यासाठी भारत निवडणूक आयोगानं निवडणूक यंत्रणा आणि राजकीय पक्षांसाठी मार्गदर्शक तत्वं जारी केली आहेत. मतदार यादी आणि निवडणूक साहित्यासाठी कागदाचा कमीत कमी वापर करावा, शक्यतो ई-बुक्स आणि ई-दस्तऐवजांचा वापर करावा, प्रिंट घेताना ती एका पानावर पाठपोट घ्यावी, एकदाच वापरून फेकून द्याव्या लागणाऱ्या प्लास्टिकचा वापर पूर्णतः टाळावा, संकलनाची स्वतंत्र व्यवस्था असावी, प्रत्येक प्रकारच्या कचऱ्यासाठी विल्हेवाटीची व्यवस्था असावी,

वाहतुकीसाठी पर्यावरणपूरक वाहनं, एकाच वाहनांतून अनेकांनी प्रवास करणं, सार्वजनिक वाहतूक याला प्रोत्साहन द्यावं, राजकीय पक्षांनी आपल्या प्रचार कार्यक्रमांमधे अक्षय ऊर्जेचा वापर करावा अशा सूचनांचा यात समावेश आहे.

शाश्वत निवडणुकांसाठी मतदान केंद्रांवर पोहचण्याचा वेळ कमी व्हावा यासाठी मतदान केंद्रांची ठिकाणं एकाच ठिकाणी आणण्याचा प्रयत्न करावा अशी सूचनाही आयोगानं केली आहे.

**<><><><><><>**

लोकसभा निवडणुकीसाठी, काँग्रेसनं आज सहावी उमेदवार यादी जाहीर केली. यात पाच उमेदवारांचा समावेश आहे. त्यानुसार राजस्थानातल्या कोटा लोकसभा मतदारसंघातून प्रल्हाद गुंजाळ, आजमेरमधून रामचंद्र चौधरी, भिलवाडा मतदारसंघातून डॉ दामोदर गुर्जर तर राजसमंद मधून सुदर्शन रावत, निवडणुक लढवतील. तमिळनाडूतल्या तुरुनेलवेली मतदारसंघातून सी रॉबेंट रुस यांना काँग्रेसनं उमेदवारी दिली आहे.

**<><><><><><>**

कर्नाटकात, कल्याण राज्य प्रगती पक्षाचे नेते जी जनार्दन रेड्डी यांनी आज त्यांचा पक्ष भाजपात विलीन केला. भाजपा नेते बी एस येडीयुरुप्पा आणि कर्नाटक भाजपा प्रदेशाध्यक्ष बी वाय विजेंद्र यांच्या उपस्थितीत जनार्दन रेड्डी आणि त्यांच्या पत्नी अरुणालक्ष्मी यांनी भाजपात प्रवेश केला. कोणत्याही अटी न घालता कोणत्याही पदाची अपेक्षा न करता आपण भाजपात प्रवेश केला असल्याचं रेड्डी यांनी सांगितलं.

**<><><><><><>**

परराष्ट्र व्यवहार मंत्री एस जयशंकर यांनी आज सिंगापूरचे प्रधानमंत्री ली शियन लुंग यांची भेट घेतली. लूंग यांच्या भारताविषयीच्या सकारात्मक भावना दोन्ही देशांमधल्या संबंधाना अधिक बळकटी देणाऱ्या वाटल्याचं जयशंकर यांनी समाजमाध्यमवरच्या एका संदेशात म्हटलं आहे. सध्याच्या जागतिक परिस्थितिकडे पाहण्याच्या लूंग यांच्या दृष्टिकोनाचा भारताला सन्मान वाटत असल्याचंही जयशंकर यांनी या संदेशात म्हटलं आहे.

लुंग यांच्या भेटीपूर्वी जयशंकर यांनी सिंगापूरचे परराष्ट्र व्यवहार मंत्री व्हिव्हियन बाल कृष्णन यांचीही भेट घेतली. या भेटीदरम्यान त्यांनी भारत-सिंगापूर दरम्यानच्या सहकार्याच्या प्रगतीचा आढावा घेतला. जयशंकर सिंगापूरच्या तीन दिवसीय दौऱ्यावर आहेत.

**<><><><><><>**

पाकिस्ताननं जम्मू-काश्मीरमध्ये सीमेपलीकडून दहशतवादी हल्ले करत राहणारे दहशतवादी कारखाने बंद करावेत, असा सल्ला त्यांना देणं गरजेचं असल्याचं मत राज्यसभेचे उपसभापती हरिवंश यांनी व्यक्त केलं आहे. ते काल स्वित्झर्लँडमधे जिनिव्हा इथं आंतरसंसदीय संघाच्या १४८व्या आमसभेत, बोलत होते. दहशतवाद्यांना आश्रय देणं आणि त्यांना सक्रीय मदत करणं हाच पाकिस्तानचा इतिहास आहे. संयुक्त राष्ट्रांच्या सुरक्षा परिषदेनं बंदी घातलेल्या दहशतवाद्यांपैकी सर्वात जास्त दहशतवाद्यांना आश्रय देण्याचा विक्रम पाकिस्तानच्याच नावावर आहे, असा आरोप त्यांनी केला.

**<><><><><><>**

भारत बायोटेक इंटरनॅशनल लिमिटेड या लस बनवणाऱ्या कंपनीनं भारतात प्रौढांवर क्षयरोग प्रतिबंधक लसीच्या म्हणजे एम टी बी व्हॅकच्या चाचण्या सुरू

केल्या आहेत. बायोफॅब्री या स्पॅनिश बायो फार्मास्युटिकल कंपनीनं मानवी स्त्रोताकडून मिळवलेली, ही क्षयरोग प्रतिबंधाची पहिली लस आहे. या चाचण्या बायोफॅब्रिच्या सहकार्यानं केल्या असल्याचं कंपनीनं म्हटलं आहे.

एचआयव्ही संक्रमित नसणाऱ्या प्रौढांमध्ये या लसीची मात्रा यापूर्वीच दिली असून, एम टी बी व्हॅक ही लस सुरक्षित आहे की नाही हे निर्धारित करण्यासाठी आता एचआयव्ही बाधित प्रौढांना ही लस देऊन त्याच्या दुसऱ्या टप्प्याचा अभ्यास सुरू केला असल्याचंही कंपनीनं म्हटलं आहे.

**<><><><><>**

मध्य प्रदेशात उज्जैन इथल्या महाकालेश्वर मंदिराच्या गाभाऱ्यात लागलेल्या आगीत पुजाऱ्यांसह सुमारे १४ जण जखमी झाले आहे. मंदिरात आज सकाळी भस्म आरती सुरु असताना ही आग लागल्याची माहिती जिल्हा प्रशासानं दिली आहे. जिल्हाधिकाऱ्यांनी या घटनेच्या चौकशीचे आदेश दिले आहेत. मुख्यमंत्री डॉ. मोहन यादव यांनी आगीतल्या पिडीतांना प्रत्येकी १ लाख रुपये आणि मोफत उपचारांची मदत जाहीर केली आहे. दोषींविरोधात कडक कारवाई करायचे निर्देशही त्यांनी दिले आहेत,

या दुर्घटनेबद्दल प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी दुःख व्यक्त तेलं आहे. सर्व जखमी लवकर बरे होवोत अशी कामनाही त्यांनी केली आहे. केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनीही या घटनेबद्दल मध्य प्रदेशाचे मुख्यमंत्री मोहन यादव यांच्यासोबत चर्चा करून माहिती घेतली. स्थानिक प्रशासन जखमींना आवश्यक ती मदत करत असल्याचं त्यांनी समामध्यमांवरच्या संदेशातून कळवलं आहे.

**<><><><><>**

युनायटेड वेस्टर्न बँकेतर्फे त्यांचे संस्थापक वा. ग. चिरमुले यांच्या स्मरणार्थ दिला जाणारा पुरस्कार २०२२ या वर्षासाठी डॉ. राजेंद्रसिंह यांना जाहीर झाला आहे. जलसंधारण आणि त्याचं व्यवस्थापन, निसर्ग पुनरुत्पादन, पर्यावरण आणि सामाजिक कार्यक्षेत्रातल्या त्यांच्या महत्त्वपूर्ण योगदानाबद्दल राजेंद्रसिंह यांची या पुरस्कारासाठी निवड झाली आहे.

सन्मानचिन्ह आणि एक लाख रुपये असं या पुरस्काराचं स्वरूप आहे. येत्या ३१ तारखेला सातार्‍यात राजेंद्रसिंह यांना हा पुरस्कार प्रदान केला जाईल.

**<><><><><><>**

देशभरात, विशेषतः देशाच्या उत्तरभागात होळी आणि धुलिवंदनाचा सण उत्साहात साजरा करण्यात आला.

राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू आणि उपराष्ट्रपती जगदीप धनखड यांनी देशवासियांना होळीच्या शुभेच्छा दिल्या आहेत. रंगांचा हा सण देशवासियांमध्ये प्रेम आणि बंधुभावाची भावना अधिक दृढ करेल, असं राष्ट्रपतींनी समाजमाध्यमांवर दिलेल्या संदेशात म्हटलं आहे. तर होळी सण निसर्गाच्या विपुलतेचं प्रतीक असून होळीमुळे लोकांचं जीवन आनंद, आशा आणि सौहार्दाने भरून जाईल, असं उपराष्ट्रपती जगदीप धनखड यांनी म्हटलं आहे. केंद्रीय गृहमंत्री अमित शहा आणि संरक्षण मंत्री राजनाथ सिंह यांनीही देशवासियांना होळीच्या शुभेच्छा दिल्या आहेत.

**<><><><><><>**

राज्यातही सर्वत्र विविध पद्धतीनं होळी आणि धूलिवंदनाचा सण साजरा करण्यात आला.

**मुंबईत** धारावी इथं कोळी बांधवांनी पारंपरिक वेशभुषेसह शंकासुरही नाचवत होलिका दहनाचा उत्सव साजरा केला.

**रायगड, रत्नागिरी आणि सिंधुदुर्ग** या तीनही जिल्ह्यांमध्ये गावागावात रोंबाट, धुलिवंदन आणि वेगवेगळ्या वेशभूषेतल्या नाच गाण्यांनी शिमगोत्सव साजरा होत आहे. **रत्नागिरीत** अंधश्रद्धा निर्मूलन समितीच्या खेड इथल्या कार्यकर्त्यांनी पाण्याने होळी पेटवून त्यामागचं विज्ञान उपस्थितांना सांगत अंधश्रद्धा निर्मूलनाचा अनोखा प्रयोग केला.

**वाशिममध्ये** बंजारा तांड्यातल्या महिलांनी पारंपारिक वेशभूषा आणि नृत्यानं धुळवड साजरी केली. बंजारा समाजाचा उत्सव गुडीपाडव्यापर्यंत चालणार आहे.

**नंदुरबारमध्ये** मोठ्या उत्साहात आदिवासी काठी संस्थानाचा रजवाडी होळी उत्सव झाला. देशविदेशातून आलेल्या पर्यटकांनीही या उत्सवाचा आनंद लुटला. आज सकाळी सहाच्या सुमाराला हजारो आदिवासी बांधवांच्या उपस्थितीत होलिका दहन झालं. यावेळी पारंपरिक वाद्यांच्या तालावर त्यांनी नृत्य केलं.

**<><><><><><>**

गाझा पट्टीत तात्काळ युद्धबंदीच्या सुधारित प्रस्तावावर आज संयुक्त राष्ट्रांच्या सुरक्षा परिषदेत मतदान होणार आहे. मुस्लिमांचा पवित्र महिना रमजानच्या काळात ताबडतोब युद्धबंदी करण्याची मागणी या मसुद्यात असण्याची शक्यता आहे. संयुक्त राष्ट्रांचे महासचिव अँटोनियो गुटेरस यांनी जॉर्डनमधे अम्मन इथं पत्रकारपरिषदेत ही माहिती दिली. गेल्या शुक्रवारी मांडलेल्या ठरावार रशिया आणि चीन ने नकाराधिकार वापरला. इस्राएलने राफा मधे लष्करी कारवाई करण्याचा इशारा मागं घ्यावा, अशी स्पष्ट तरतूद प्रस्तावात नसल्याच्या कारणावरुन या देशांनी प्रस्तावाला हरकत घेतली.

**<><><><><><>**

आयपीएल टी ट्वेन्टी क्रिकेट स्पर्धेत आज बंगळुरूच्या चिन्नास्वामी स्टेडियमवर रॉयल चैलेंजर्स बंगळुरू आणि पंजाब किंग्ज यांच्यात सामना सुरु आहे. रॉयल चैलेंजर्स बंगळुरुनं नाणेफेक जिंकून प्रथम क्षेत्ररक्षण करायचा निर्णय घेतला आहे.

शेवटची बातमी हाती आली तेव्हा पंजाब किंग्जच्या नवव्या षटकात २ बाद ७२ धावा झाल्या होत्या.

**<><><><><><>**

अरुणाचल प्रदेश, आसाम, मेघालय, सिक्कीम आणि पश्चिम बंगालमध्ये उद्यापर्यंत पाऊस आणि वादळाचा अंदाज भारतीय हवामान विभागानं वर्तवला आहे. पश्चिम बंगालमधल्या गंगेच्या खोऱ्याच्या प्रदेशात ढगाच्या गडगडाटासह हलका ते मध्यम पाऊस पडण्याची शक्यता आहे.

**//<><><><><><>//**